# नियमित दिवाणी दावा क्र. ५३/२०१९ मधील नि.क्र. २७ वरील आदेश

(CNR NO MHR140003152019)

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी त्यांस दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे देवून जोरदार हरकत घेतलेली असून असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी सरकारी कार्यालयामध्ये कागदपत्रे मिळण्यासाठी प्रतिवादी यांनी काय प्रयत्न केले आहेत. याचा कोणताही कायदेशीर पुरावा दिलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर केल्यास जास्तीत जास्त खर्चासह मंजूर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हक्क प्रस्थापनेकरीता, जाहीर ठरावाकरीता, वाटपाकरीता, खरेदीखत रद्द करणेकरीता तसेच निंरतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. सदर प्रतिवादी क्र. २ व ३ हे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध करत असून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर प्रतिवादींना झालेला ९ महिने १८ दिवसांचा विलंब माफ करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे योग्य होईल. सदर प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी त्यांची कैफियत विलंबाने दिली असल्यामुळे जो असोइस्करपणा झाला त्याकरीता प्रतिवादी क्र. २ व ३ यांस खर्च लावून त्यांचा अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | प्रतिवादी क्र. २ व ३ यांचा अर्ज रक्कम रु. ३००/- च्या खर्चासह मंजूर |

| | |
|---|---|
| | करणेत येत आहे. |
| २ | प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी  खर्चाची रक्कम रु. ३००/– वादी यांना दयावी. |

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)

दिनांक – १९.०६.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.